# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३११७ email:-establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./३६६ /२०२५ दि.२४ /०१/२०२५

## *परिपत्रक*

विद्यापीठ आस्थापनेवरील सर्व सांविधानिक अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी तसेच कंत्राटी तत्वावर व मुख्यमंत्री युवा रोजगार योजनेअंतर्गत कार्यरत सर्व सेवक यांना कळविण्यात येते की, महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने २६ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव-२०२४ च्या आयोजनाची जबाबदारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली कडे सोपविलेली आहे. सदर क्रीडा महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठांमधील विद्यार्थी ॲथलेटीक्स, बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनीस, बॅडमिंटन व चेस या क्रीडा प्रकारामध्ये सहभाग नोंदविणार आहेत. सदर स्पर्धा दिनांक १८ ते २२ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने स्पर्धा कार्यक्रमाचा जवळ येणारा कालावधी पाहता व पुर्वनियोजनाच्या तयारीकरीता दिनांक २५ जानेवारी, २०२५ सुट्टीच्या दिवशी(चौथा शनीवार) विद्यापीठातील सर्व कार्यालये नियमीत सुरू ठेवण्यात येत आहे. करीता सर्वांनी कार्यालयीन वेळेत नमूद दिनांकास कार्यालयात हजर राहून नियमीत कार्यालयीन कामे पार पाडावीत. दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी सुट्टीच्या दिवशी नियमीत कामकाज सुरू ठेवल्याबद्दलची पर्यायी रजा माहे मार्च २०२५ दरम्यान परिपत्रक निर्गमित करून देण्याची कार्यवाही घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. अनिल हिरेखण)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

***प्रतिलिपी माहितीकरीता सादर:-***

*१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
*२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
*३. सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना निर्देश देण्यात येते की, आपणासह आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सदर परिपत्रकाबाबत अवगत करावे.*
*४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, दिनांक २५/०१/२०२५ रोजी विद्यापीठ कामकाज नियमीत पणे सुरू राहील याची नोंद घ्यावी.*
*५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.*

*Pravinbrd E:\Ashwamegh Programm\Circular\Paryayi raja*